Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

दैनिक जन

सत्याचे प्राईम्स

सम्राट टाईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

'खेत बचाव अभियान 'अंतर्गत बेटावद येथे जनजागृती! (पान २ वर)



। बुधवार, दि. २८ ऑक्टोबर २०२६ । वर्ष १ । अंक १९७ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

नर्मदा जलविवाद निवाड्यानुसार पाच टीएमसी पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा

दुष्काळग्रस्त महाराष्ट्राला गुजरातकडून दिलासा!

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नर्मदा नियंत्रण प्राधिकरणाच्या बैठकीत मागणी

जन सम्राट टाईम्स

मुंबई | राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये दुष्काळाची तीव्रता वाढल्याने शेतकरी संकटात सापडले आहेत. अशा परिस्थितीत महाराष्ट्रासाठी दिलासादायक घडामोड समोर आली आहे. नर्मदा जलविवाद निवाड्यानुसार महाराष्ट्राच्या वाट्याचे उकाई धरणातील पाच टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याबाबत नर्मदा नियंत्रण प्राधिकरणाच्या उच्चस्तरीय पुनर्विचार समितीच्या बैठकीत निर्देश देण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राची बाजू ठामपणे मांडत या पाण्याची मागणी केली.



केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी त्यानुसार तातडीने निर्देश दिले.नर्मदा जलविवाद निवाड्यानुसार महाराष्ट्राला एकूण दहा टीएमसी पाणी मंजूर आहे. त्यापैकी पाच टीएमसी पाणी वळण कालव्याद्वारे मिळणार असून, उर्वरित पाच टीएमसी पाणी गुजरातमधील उकाई धरणातून देण्याचे निश्चित करण्यात आले होते. मात्र, या पाण्याच्या उपलब्धतेसंदर्भात कार्यवाही होणे अपेक्षित होते. नर्मदा नियंत्रण प्राधिकरणाच्या उच्चस्तरीय पुनर्विचार समितीच्या दूरदृश्यप्रणालीद्वारे झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या प्रकल्पविषयक दायित्वांची माहिती देत उकाई धरणातील राज्याच्या हक्काचे पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी केली. यावेळी केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील आणि गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्याकडेही त्यांनी हा विषय मांडला. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत यापूर्वी झालेल्या बैठकीत नियमानुसार महाराष्ट्राला पाणी देण्याचा निर्णय झाल्याचे मुख्यमंत्र्यांनी निदर्शनास आणून दिले. त्यानुसार उकाई धरणातून महाराष्ट्राला पाणी मिळणे अपेक्षित असल्याची भूमिका त्यांनी स्पष्ट केली. मुख्यमंत्र्यांनी मांडलेल्या भूमिकेनुसार महाराष्ट्राला त्याच्या वाट्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे, असे केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी स्पष्ट केले. या बैठकीला मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहनलाल यादव, राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा तसेच महाराष्ट्राचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा आणि जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले उपस्थित होते. दरम्यान, राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. अखिल भारतीय किसान सभेच्या मागण्यांसंदर्भात सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत त्यांनी शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी विविध उपाययोजनांची माहिती दिली. दुष्काळामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची अग्रिम मदत देण्यात येईल. या मदतीमुळे शेतकऱ्यांना राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीच्या (NDRF) निकषांपेक्षा अधिक मदत मिळणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. अडचणीत असलेल्या उपसा सिंचन योजनांचे कर्ज माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देशही देण्यात आले. दुष्काळग्रस्त भागांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरू करणे आणि जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देणे याला शासनाचे प्राधान्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पाणी आणि मदतीच्या निर्णयांकडे शेतकऱ्यांचे लक्ष

एकीकडे महाराष्ट्राच्या वाट्याचे नर्मदेचे पाणी मिळविण्यासाठी हालचाली सुरू झाल्या आहेत, तर दुसरीकडे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत, पिण्याचे पाणी आणि चारा उपलब्ध करून देण्यावर शासन भर देत आहे. मात्र, पाच टीएमसी पाण्याच्या प्रत्यक्ष उपलब्धतेची कार्यवाही आणि मदतीचे वेळेत वितरण यावरच या निर्णयांचा शेतकऱ्यांना किती दिलासा मिळतो, हे अवलंबून राहणार आहे.

Selected

मुंबईत दोन टँकरसह ९४. ३७ लाखांचा मुद्देमाल जप्त

मुंबई । तुर्भे परिसरात इंधनाच्या कथित अवैध हस्तांतरणाचा प्रकार समोर आला आहे. मुंबई-ठाणे शिधावाटप विभागाच्या भरारी पथकाने कारवाई करत दोन टँकर आणि हजारो लिटर इंधनसदृश पदार्थ जप्त केले आहेत. जप्त मुद्देमालाची अंदाजित किंमत ९४ लाख ३६ हजार ७०८ रुपये असून, या प्रकरणी पाच जणांविरुद्ध तुर्भे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिधावाटप विभागाच्या पथकाला डिझेल वाहून नेणाऱ्या एका टँकरच्या आउटलेटमधून दुसऱ्या टँकरमध्ये इंधन भरले जात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर अधिकाऱ्यांनी संबंधित ठिकाणी छापा टाकला.या कारवाईत जप्त करण्यात आलेल्या सर्व मुद्देमालाची एकूण अंदाजित किंमत ९४ लाख ३६ हजार ७०८ रुपये असल्याची माहिती विभागाने दिली आहे.टँकरच्या चालक-मालकांसह एकूण पाच जणांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पुणेकरांनो, मुळा-मुठा नदीबाबत धक्कादायक खुलासा! पावसाळ्यातही प्रदूषणाचा विळखा कायम

जन सम्राट टाईम्स

पुणे। प्रतिनिधी: पुणे शहरातील सांडपाणी आणि प्रदूषणामुळे मुळा-मुठा नदीतील सूक्ष्मजीवांच्या नैसर्गिक रचनेत बदल होत असून, पावसाळ्यातील मोठ्या प्रवाहानंतरही ही परिस्थिती पूर्ववत होत नसल्याचे पुणेस्थित आघारकर संशोधन संस्थेच्या अभ्यासातून समोर आले आहे. नदीतील सूक्ष्म शेवाळाचा अभ्यास करताना संशोधकांना हा निष्कर्ष आढळला. नैसर्गिक प्रवाहामुळे प्रदूषके वाहून जात असली, तरी शहरी प्रदूषणाचा प्रभाव नदीतील जैवविविधतेवर कायम राहत असल्याचे स्पष्ट झाले आहे. उष्णकटिबंधीय नद्यांमध्ये मोसमी पूर आल्याने प्रदूषके वाहून जातात आणि सूक्ष्मजीवांच्या प्रजातींचे नैसर्गिक मिश्रण पुन्हा प्रस्थापित होते, असे यापूर्वीच्या संशोधनांतून दिसून आले होते. मात्र, मुळा-मुठा नदीच्या बाबतीत पावसाळ्यातील मोठ्या प्रवाहाचा परिणाम मर्यादित असल्याचे या अभ्यासातून दिसून आले. पूरस्थितीमुळे नदीतील सूक्ष्मजीवांच्या रचनेत काही काळासाठी बदल होत असले, तरी प्रदूषणाची पातळी कोणत्या प्रजाती टिकून राहतील, हे ठरवते. संशोधक प्रत्याशा नायक आणि डॉ. बालासुब्रमनियन कार्थिक यांनी २०२२ आणि २०२३ या दोन वर्षांत नदीच्या उगमक्षेत्रापासून शहरी आणि औद्योगिक भागापर्यंत १७ ठिकाणांहून पाण्याचे तसेच दगडांवर साचलेल्या जैविक थराचे नमुने गोळा केले. या नमुन्यांच्या आधारे त्यांनी डायटम्स या एकपेशीय सूक्ष्म शेवाळांचा अभ्यास केला. डायटम्सच्या पेशीभोवती सिलिकाचे कवच असते. पर्यावरणातील बदलांना हे सूक्ष्मजीव संवेदनशील असल्याने पाण्याची गुणवत्ता तपासण्यासाठी त्यांचा उपयोग केला जातो. त्यामुळे नदीतील प्रदूषणाचा परिसंस्थेवर होणारा परिणाम समजून घेण्यासाठी डायटम्सचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.संशोधनात नदीतील एखाद्या ठिकाणी आढळणाऱ्या डायटम्सच्या प्रजातींची एकूण विविधता वेगवेगळ्या ऋतूंमध्ये तुलनेने स्थिर असल्याचे आढळले. मात्र, नदीचा प्रवाह उगमक्षेत्राकडून शहरी भागाकडे जाताना प्रजातींच्या रचनेत मोठे बदल झाले. स्वच्छ आणि विरघळलेल्या ऑक्सिजनचे प्रमाण अधिक असलेल्या उगमाच्या परिसरात पश्चिम घाटातील स्थानिक प्रजाती आढळल्या. परंतु, शहरी भागात सांडपाणी आणि पोषकद्रव्यांचे प्रमाण वाढल्याने या संवेदनशील स्थानिक प्रजातींचे प्रमाण घटले. त्यांच्या जागी प्रदूषण सहन करू शकणाऱ्या प्रजातींचे प्रमाण वाढल्याचे संशोधकांना दिसून आले.नदीतील सूक्ष्मजीवांच्या रचनेत होणाऱ्या बदलांमागे पाण्याची विद्युत वाहकता आणि विरघळलेल्या ऑक्सिजनचे प्रमाण हे प्रमुख रासायनिक घटक असल्याचे संशोधनातून स्पष्ट झाले. पाण्यात विरघळलेल्या क्षारांचे प्रमाण वाढल्यास त्याची विद्युत वाहकता वाढू शकते. तसेच, सांडपाण्यामुळे पाण्यातील ऑक्सिजनचे प्रमाण प्रभावित होते. परिणामी, पर्यावरणातील बदलांना संवेदनशील असलेल्या स्थानिक प्रजातींच्या अस्तित्वावर परिणाम होऊ शकतो.नदीचे संवर्धन करण्यासाठी केवळ नैसर्गिक प्रवाह कायम ठेवणे पुरेसे नसून, शहरी सांडपाण्यावर योग्य प्रक्रिया करणे आणि नदीत सोडल्या जाणाऱ्या प्रदूषकांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. तसेच, पाण्याच्या गुणवत्तेच्या निकषांची कठोर अंमलबजावणी करणेही महत्त्वाचे आहे. नदीतील स्थानिक जैवविविधता टिकवण्यासाठी प्रवाह व्यवस्थापनासोबतच प्रदूषण नियंत्रणाला प्राधान्य द्यावे लागणार आहे. पावसाळ्यातील मोठ्या प्रवाहानंतरही सूक्ष्मजीवांची नैसर्गिक रचना पूर्ववत होत नसल्याचे निष्कर्ष नदी संवर्धनासाठी प्रदूषण नियंत्रणाचे महत्त्व अधोरेखित करतात. पुणे शहरातील सांडपाणी आणि प्रदूषणामुळे मुळा-मुठा नदीतील सूक्ष्मजीवांच्या नैसर्गिक रचनेत बदल होत असून, पावसाळ्यातील मोठ्या प्रवाहानंतरही ही परिस्थिती पूर्ववत होत नसल्याचे पुणेस्थित आघारकर संशोधन संस्थेच्या अभ्यासातून समोर आले आहे. नदीतील सूक्ष्म शेवाळाचा अभ्यास करताना संशोधकांना हा निष्कर्ष आढळला. नैसर्गिक प्रवाहामुळे प्रदूषके वाहून जात असली, तरी शहरी प्रदूषणाचा प्रभाव नदीतील जैवविविधतेवर कायम राहत असल्याचे या संशोधनातून स्पष्ट झाले आहे.



साय डोंगरातील टोरंट प्रकल्पावरून महायुतीतच मतभेद

जन सम्राट टाईम्स

कर्जत । प्रतिनिधी: कर्जत तालुक्यातील साय डोंगर परिसरात प्रस्तावित टोरंट पॉवरच्या ऊर्जा साठवण प्रकल्पावरून आता राजकीय वातावरण तापले आहे. या प्रकल्पाला चहूबाजूंनी विरोध होत असतानाच आता महायुतीतील मित्रपक्षांनीसुद्धा आक्षेप घेतला असल्याचं दिसत आहे. स्थानिक नागरिक, पर्यावरणप्रेमी आणि राजकीय विरोधकांकडून विरोध होत असतानाच आता सत्ताधाऱ्यांना मित्रपक्षांनासुद्धा सामोरे जावे लागत आहे. या प्रकल्पावरून वाद निर्माण होत असतानाच एका बाजूला शिवसेना शिंदे गटाचे आमदार महेंद्र थोरवे यांनी प्रकल्पामुळे स्थानिकांना रोजगाराच्या संधी मिळतील, अशी भूमिका मांडली आहे. तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे रायगड जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे यांनी वृक्षतोड आणि स्थानिकांच्या विरोधाचा मुद्दा उपस्थित करत या प्रकल्पाला विरोध दर्शवला आहे.साय डोंगर परिसरातील प्रकल्पाला स्थानिकांकडून विरोध होत असताना आमदार महेंद्र थोरवे यांनी त्याला पाठिंबा दिला आहे. या प्रकल्पातून रोजगारनिर्मिती होण्याची शक्यता त्यांनी मांडली. मात्र, एवढ्या मोठ्या प्रकल्पाला विरोध होत असतानाही थोरवे समर्थन का देत आहेत, असा सवाल सुधाकर घारे यांनी उपस्थित केला.घारे यांनी थोरवेंच्या भूमिकेवर टीका करत स्थानिकांच्या हिताचा विचार करण्याची गरज अधोरेखित केली. स्थानिकांना नुकसान पोहोचवणारे प्रकल्प आणले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. कर्जत तालुक्यातील साय डोंगर परिसरात टोरंट पॉवर कंपनीचा तीन हजार मेगावॉट क्षमतेचा जलविद्युत ऊर्जा साठवण प्रकल्प प्रस्तावित आहे. या प्रकल्पाशी संबंधित वृक्षतोडीवरून ग्रामस्थांमध्ये नाराजी असल्याचे सांगितले जात आहे. वृक्षतोड जवळपास सहा महिने सुरू राहणार असल्याचा दावाही करण्यात आला आहे. या मुद्द्यावर स्थानिक ग्रामस्थ, शेतकरी आणि पर्यावरणप्रेमी संघटनांनी आक्षेप घेतला आहे. शिवसेना ठाकरे गट, महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शेतकरी कामगार पक्षानेदेखील वृक्षतोडीला विरोध दर्शवला आहे. राष्ट्रवादीचे सुधाकर घारे यांनी प्रकल्पाच्या जनसुनावणीदरम्यान स्थानिकांचा मोठ्या प्रमाणात विरोध असल्याचा दावा केला. अशा परिस्थितीत प्रकल्प पुढे कसा नेला जात आहे, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. एकीकडे रोजगारनिर्मितीचा मुद्दा मांडला जात आहे.



गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा !

पाचोरा,: अहिर सुवर्णकार मंडळ, पाचोरा, जिल्हा जळगाव यांच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा २०२६ रविवार, दि. २५ ऑक्टोबर २०२६ रोजी उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरणात संपन्न झाला. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रोत्साहन देणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. श्री. विनेशजी एकनाथशेठ कोठलीकर श्री. सिद्धेश संजय थोरात तसेच सौ. निताताई प्रविणशेठ जडे (महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट कारागीर पुरस्कार प्राप्त, हस्तकला, पारोळा) यांची उपस्थिती लाभली.

जळगावमध्ये SEA चा ठिय्या आंदोलन

जन सम्राट टाईम्स

जळगाव | प्रतिनिधी: जळगाव मंडळातील दोन सहाय्यक अभियंत्यांच्या कथित एकतर्फी आणि अन्यायकारक निलंबनाच्या निषेधार्थ स्टेट इंजिनिअर्स असोसिएशन (SEA), जळगाव मंडळाच्या वतीने मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर २०२६ रोजी अधीक्षक अभियंत्यांच्या दालनात शांततापूर्ण ठिय्या आंदोलन करण्यात आले. निलंबनाचा निर्णय रद्द करून संबंधित अभियंत्यांना न्याय द्यावा, अशी मागणी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह सदस्यांनी केली. निलंबनाच्या निर्णयावरून वाद संघटनेने दिलेल्या माहितीनुसार, सोमवार, दि. २६ ऑक्टोबर रोजी JMD कोकण प्रादेशिक विभागाच्या भेटीदरम्यान जळगाव मंडळातील दोन सहाय्यक अभियंत्यांना अधीक्षक अभियंत्यांनी निलंबित केले. हा निर्णय एकतर्फी आणि अन्यायकारक असल्याची भूमिका SEAने घेतली असून, निलंबन रद्द करण्यासाठी संघटनेने प्रशासनाशी चर्चा करण्याचा प्रयत्न केला. मंगळवारी SEA जळगाव मंडळाचे जॉइंट सेक्रेटरी, सर्कल सचिव, सर्कल अध्यक्ष आणि अन्य सभासद अधीक्षक अभियंत्यांच्या दालनात चर्चेसाठी उपस्थित झाले. मात्र, निलंबनाच्या प्रश्नावर प्रशासनाकडून ठोस भूमिका किंवा समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याचा आरोप संघटनेने केला. त्यानंतर सदस्यांनी दालनात शांततापूर्ण ठिय्या मांडून निलंबनाच्या निर्णयाचा निषेध व्यक्त केला. पोलिसांचा मोठा बंदोबस्त; दालन रिकामे करण्याचा प्रयत्न संघटनेच्या म्हणण्यानुसार, चर्चेतून तोडगा न निघाल्याने सायंकाळी सुमारे ६ वाजता पोलीस निरीक्षकांसह मोठा पोलीस बंदोबस्त आणि सीआरपीएफची व्हॅन घटनास्थळी बोलावण्यात आली. जिल्ह्यातील सुमारे २०० हून अधिक महिला व पुरुष अभियंते उपस्थित असताना, सदस्यांना दालनातून बाहेर काढण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप SEAने केला. या कारवाईदरम्यान सभासदांनी एकजूट कायम ठेवत शांततापूर्ण विरोध सुरू ठेवला. संघटनेच्या दाव्यानुसार, सदस्यांच्या एकत्रित भूमिकेमुळे प्रशासनाला दालन रिकामे करण्याच्या प्रयत्नातून माघार घ्यावी लागली. SEAची एकजूट; निलंबन मागे घेण्याची मागणी चर्चेसाठी आलेल्या अभियंत्यांच्या भूमिकेचा आणि शांततापूर्ण आंदोलनाचा अवमान झाल्याचा आरोप करत SEA जळगाव मंडळाने प्रशासनाच्या भूमिकेचा तीव्र निषेध नोंदवला. दोन सहाय्यक अभियंत्यांचे निलंबन रद्द करून या प्रकरणात न्याय्य निर्णय घ्यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे. अभियंत्यांच्या निलंबनावरून सुरू झालेला हा संघर्ष आता प्रशासन आणि कर्मचारी संघटना यांच्यातील संवादाचा महत्त्वाचा मुद्दा बनला आहे. आंदोलनाची तीव्रता वाढण्याऐवजी चर्चेच्या माध्यमातून प्रश्न सोडविणे, निलंबनाच्या निर्णयामागील कारणे स्पष्ट करणे आणि संबंधित सर्व बाजूंचे म्हणणे ऐकून न्याय्य तोडगा काढणे आवश्यक आहे.



जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

राज्य सरकारचा निर्णयांचा धडाका! शेतकऱ्यांना आणखी एक दिलासा

ओला चारा ८ रुपये किलोने खरेदी करणार; चारा लागवडीसाठी सरकारी जमिनी उपलब्ध होणार

जन सम्राट टाईम्स

मुंबई| प्रतिनिधी: राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आणि पशुपालकांसमोर उभ्या राहिलेल्या संकटावर मात करण्यासाठी राज्य सरकारने विविध उपाययोजनांची घोषणा केली आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची अग्रिम आर्थिक मदत, दुष्काळ निवारणासाठी केंद्र सरकारकडे ४० हजार कोटी रुपयांचा प्रस्ताव पाठविण्याची तयारी आणि उपसा सिंचन योजनांच्या कर्जमाफीच्या निर्णयानंतर आता जनावरांच्या चाऱ्याबाबतही महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. सुका चारा १२ रुपये, तर ओला चारा ८ रुपये प्रतिकिलो दराने खरेदी करण्याचे दर निश्चित करण्यात आले आहेत. महसूलमंत्री आणि दुष्काळ निवारण उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही माहिती दिली. चारा लागवडीसाठी पाच सदस्यीय समिती दुष्काळाच्या काळात जनावरांना पुरेसा चारा उपलब्ध व्हावा, यासाठी शेतकऱ्यांनी चारा लागवड करावी, असे आवाहन राज्य सरकारने केले आहे. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला चारा सरकार खरेदी करणार असल्याचेही यापूर्वी जाहीर करण्यात आले होते. या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय समिती स्थापन करण्यात येणार आहे. चारा लागवड आणि जनावरांना चारा उपलब्ध करून देण्यासंदर्भातील निर्णय घेण्याचे अधिकार या समितीला दिले जाणार असल्याची माहिती बावनकुळे यांनी दिली. चाऱ्याचे दर निश्चित; वाहतुकीसाठी स्वतंत्र निधी सरकारने निश्चित केलेल्या दरानुसार सुका चारा प्रतिकिलो १२ रुपये आणि ओला चारा प्रतिकिलो ८ रुपये दराने खरेदी केला जाणार आहे. चारा उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळावे आणि दुष्काळी भागातील पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता वाढावी, हा या निर्णयामागील उद्देश आहे.



चारा वाहतुकीसाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून दिला जाणार असल्याचेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले. सरकारी जमिनींवर चारा लागवडीला प्रोत्साहन चारा उत्पादन वाढविण्यासाठी वन विभागाच्या जागांवर लागवड करण्याकरिता जिल्हा नियोजन समितीच्या (DPDC) माध्यमातून निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. तसेच महसूल विभाग, जलसंपदा विभाग, जलसंधारण विभाग आणि इतर शासकीय जमिनी चारा लागवडीसाठी उपलब्ध करून देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे चारा उत्पादन वाढविण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे. बंद पाणीपुरवठा योजनाही सुरू करणार ज्या भागांत पाणी उपलब्ध आहे; मात्र वीजबिल थकल्यामुळे किंवा वीजजोडणी खंडित झाल्याने पाणीपुरवठा योजना बंद आहेत, अशा योजनांसाठी DPDCमधून निधी देण्याची तरतूद करण्यात येणार आहे. आवश्यक निधी उपलब्ध करून वीजजोडण्या सुरू करण्यावर भर दिला जाणार आहे. यामुळे ग्रामीण भागातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यास मदत होऊ शकते.

रॉयल्टी माफी आणि पाणंद रस्त्यांबाबतही निर्णय तलावांचे खोलीकरण करताना निघणाऱ्या मुरमावरील रॉयल्टी माफ करण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती बावनकुळे यांनी दिली. पाणंद रस्त्यांच्या कामांसाठी असलेली ६० आणि ४० टक्क्यांची निर्णयाची माहिती त्यांनी दिली. या कामांसाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. सिंधुदुर्गातील चारा दुष्काळी जिल्ह्यांना सिंधुदुर्ग जिल्ह्यात उपलब्ध असलेला अतिरिक्त चारा इतर गरजू जिल्ह्यांमध्ये पोहोचविण्याचे नियोजन करण्यात येणार आहे.

‘खेत बचाव अभियान’अंतर्गत बेटावद येथे जनजागृती!

जमिनीचे आरोग्य संवर्धन आणि नैसर्गिक शेतीबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन

जन सम्राट टाईम्स

शिंदखेडा। प्रतिनिधी : केंद्र शासनाच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या वतीने २२ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या ‘खेत बचाव अभियान – रब्बी हंगाम २०२६’ अंतर्गत शिंदखेडा तालुक्यातील बेटावद, वारूळ आणि दभाषी येथे जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न झाले. रब्बी हंगामातील पीक नियोजन, जमिनीचे आरोग्य जपणे आणि नैसर्गिक शेतीचा अवलंब करण्याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तालुका कृषी अधिकारी कार्यालय, शिंदखेडा, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) आणि कृषी विज्ञान केंद्र, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर २०२६ रोजी या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. उपलब्ध पाणीसाठ्यानुसार पीक नियोजनाचे आवाहन कृषी विज्ञान केंद्र, धुळे येथील शास्त्रज्ञ डॉ. पंकज पाटील आणि डॉ. अतिष पाटील यांनी शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील पीक नियोजनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. उपलब्ध पाणीसाठ्याचा विचार करून गहू, हरभरा आणि रब्बी ज्वारी या पिकांची निवड कशी करावी, याची माहिती त्यांनी दिली. पेरणीपूर्व मशागत, बियाणे प्रक्रिया, जमिनीचे आरोग्य संवर्धन आणि सुधारित कृषी तंत्रज्ञानाचा वापर याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. जमिनीची सुपीकता टिकवून ठेवणे, उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करणे आणि पीक व्यवस्थापनाचे नियोजनपूर्वक निर्णय घेणे आवश्यक असल्याचे शास्त्रज्ञांनी अधोरेखित केले. नैसर्गिक शेतीबाबत जनजागृती बेटावद आणि दभाषी येथे राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानांतर्गत रब्बी हंगाम जनजागृती कार्यक्रमही



आयोजित करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीचे महत्त्व, शेती व्यवस्थापनातील सुधारणा आणि जमिनीचे आरोग्य जपण्याबाबत माहिती देण्यात आली. शेतकऱ्यांना कृषीविषयक माहितीपत्रकांचे वाटप करून रब्बी हंगामातील पीक व्यवस्थापनाविषयी मार्गदर्शन करण्यात आले. शेतीतील उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर आणि जमिनीची गुणवत्ता टिकविण्यासाठी शास्त्रीय दृष्टिकोन स्वीकारण्याचे आवाहन करण्यात आले. कृषी विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची उपस्थिती या कार्यक्रमांना तालुका कृषी अधिकारी सुधीर ईशी, मंडळ कृषी अधिकारी नरडाणा विशाल पावरा, विजय सोनवणे आणि सहायक कृषी अधिकारी शुभांगी जाधव यांच्यासह कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन संदीप पवार आणि किरण देसले यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कृषिसखी आणि समुदाय संसाधन व्यक्तींनी (CRP) सहकार्य केले. बेटावद, वारूळ आणि दभाषी येथील शेतकरी तसेच महिला शेतकऱ्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. रब्बी हंगामाच्या पार्श्वभूमीवर पीक नियोजन, जमिनीचे आरोग्य आणि नैसर्गिक शेतीविषयी मार्गदर्शन मिळाल्याने या उपक्रमाला महत्त्व प्राप्त झाले. केंद्र शासनाच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या वतीने २२ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या ‘खेत बचाव अभियान – रब्बी हंगाम २०२६’ अंतर्गत शिंदखेडा तालुक्यातील बेटावद, वारूळ आणि दभाषी येथे जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न झाले. रब्बी हंगामातील पीक नियोजन, जमिनीचे आरोग्य जपणे आणि नैसर्गिक शेतीचा अवलंब करण्याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तालुका कृषी अधिकारी कार्यालय, शिंदखेडा, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) आणि कृषी विज्ञान केंद्र, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर २०२६ रोजी या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. उपलब्ध पाणीसाठ्यानुसार पीक नियोजनाचे आवाहन कृषी विज्ञान केंद्र, धुळे येथील शास्त्रज्ञ डॉ. पंकज पाटील आणि डॉ. अतिष पाटील यांनी शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील पीक नियोजनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. उपलब्ध पाणीसाठ्याचा विचार करून गहू, हरभरा आणि रब्बी ज्वारी या पिकांची निवड कशी करावी, याची माहिती त्यांनी दिली. पेरणीपूर्व मशागत, बियाणे प्रक्रिया, जमिनीचे आरोग्य संवर्धन आणि सुधारित कृषी तंत्रज्ञानाचा वापर याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

संपादकीय

वृक्षतोडीला विकास म्हणायचे की विनाश?

विकास हवा, प्रगती हवी, आधुनिक पायाभूत सुविधा हव्यात आणि ऊर्जेची वाढती गरजही पूर्ण व्हायला हवी. मात्र, या सगळ्याच्या बदल्यात निसर्गाचा गळा घोटायचा का? जंगलांचा विनाश करून, हजारो वृक्षांना जमिनीवर कोसळवून आणि वन्यजीवांचे अधिवास उद्ध्वस्त करून उभारल्या जाणाऱ्या प्रकल्पांना आपण डोळे झाकून विकास म्हणायचे का? हा प्रश्न आज केवळ पर्यावरणप्रेमींचा राहिलेला नाही, तर तो प्रत्येक नागरिकाच्या भविष्याशी जोडला गेला आहे.

महाराष्ट्राच्या विविध भागांत ऊर्जा प्रकल्प, रस्ते आणि इतर पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी होणाऱ्या वृक्षतोडीवरून चिंता व्यक्त केली जात आहे. भीमाशंकरसारख्या पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील परिसरापासून कर्जतच्या जंगलांपर्यंत विकासाच्या नावाखाली निसर्गावर किती ताण आणला जात आहे, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. संबंधित प्रकल्पांमध्ये नेमकी किती झाडे तोडली जाणार आहेत, किती वनक्षेत्र प्रभावित होणार आहे, पर्यावरणीय परवानग्या कोणत्या अटींवर देण्यात आल्या आहेत आणि पर्यायी मार्गांचा विचार झाला आहे का, याची स्पष्ट माहिती जनतेसमोर येणे आवश्यक आहे. झाडे म्हणजे केवळ लाकूड नव्हे, तर जीवनाचा आधार! एखादे झाड तोडले की केवळ एक खोड जमिनीवर पडत नाही; त्याच्यासोबत अनेक पक्ष्यांची घरटी, कीटकांचे जीवन, लहान-मोठ्या प्राण्यांचा निवारा आणि निसर्गातील अन्नसाखळीचा एक महत्त्वाचा दुवा धोक्यात येतो. वृक्ष मातीची धूप रोखतात, पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत करतात, कार्बन शोषून घेतात आणि स्थानिक तापमान संतुलित ठेवण्यास हातभार लावतात. त्यामुळे वृक्षतोडीचे परिणाम केवळ त्या जागेपुरते मर्यादित राहत नाहीत; त्याचे पडसाद संपूर्ण परिसराच्या पर्यावरणावर उमटू शकतात. जंगल म्हणजे जमिनीवर उभे असलेले झाडांचे केवळ संकलन नाही. ते एक जिवंत परिसंस्थान आहे. त्यामध्ये झाडे, वेली, पक्षी, प्राणी, कीटक, पाण्याचे स्रोत आणि माती यांचे परस्परांशी नाते असते. हे नाते तुटले की त्याची भरपाई काही रोपे लावून तातडीने करता येत नाही. आज मोठे झाड तोडून उद्या पाच रोपे लावल्याची घोषणा केली, तरी त्या रोपांना मोठे होण्यासाठी अनेक वर्षे लागतात. शिवाय, लावलेली रोपे जगली का, त्यांची निगा राखली का आणि त्यातून मूळ जंगलासारखी जैवविविधता निर्माण झाली का, हे तपासणेही तितकेच महत्त्वाचे आहे. ऊर्जा हवी; पण निसर्गाच्या किंमतीवर का? देशाच्या विकासासाठी ऊर्जा प्रकल्पांची गरज नाकारता येणार नाही. उद्योग, शेती, वाहतूक, घरे आणि डिजिटल अर्थव्यवस्था यांना अखंडित वीजपुरवठा आवश्यक आहे. परंतु ऊर्जेची गरज पूर्ण करताना पर्यावरणीय परिणामांकडे दुर्लक्ष करण्याची मुभा कोणालाही असू शकत नाही. प्रश्न विकासाला विरोध करण्याचा नाही; तर विकासाची दिशा योग्य आहे का, हे तपासण्याचा आहे. एखादा प्रकल्प उभारताना पर्यावरणाला कमीत कमी हानी पोहोचवणारे पर्याय शोधले का? उपलब्ध पर्यायी जागांचा अभ्यास केला का? वृक्षतोड टाळण्यासाठी प्रकल्पाच्या आराखड्यात बदल शक्य आहेत का? स्थानिक नागरिक, ग्रामस्थ, आदिवासी समाज आणि पर्यावरणतज्ज्ञांचे म्हणणे ऐकून घेतले का? या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळाल्याशिवाय विकासाच्या नावाने होणाऱ्या प्रत्येक कृतीला योग्य ठरवता येणार नाही. ऊर्जा निर्माण करण्याच्या नावाखाली जंगल उद्ध्वस्त करायचे आणि त्याच वेळी हवामान बदलाचा सामना करण्यासाठी कोट्यवधी वृक्षलागवडीच्या घोषणा करायच्या, हा विरोधाभास दूर झाला पाहिजे. पर्यावरणपूरक विकास म्हणजे केवळ प्रकल्पाच्या अहवालात पर्यावरणाचा उल्लेख करणे नव्हे; तर प्रत्यक्ष नियोजन, अंमलबजावणी आणि देखरेखीमध्ये निसर्गाला केंद्रस्थानी ठेवणे होय. भीमाशंकर आणि कर्जतचा प्रश्न केवळ स्थानिक नाही भीमाशंकरचा परिसर जैवविविधता आणि पश्चिम घाटाच्या पर्यावरणीय महत्त्वामुळे विशेष संवेदनशील आहे. कर्जत परिसरातही जंगल, डोंगर, जलस्रोत आणि स्थानिक जैवविविधतेचे संरक्षण महत्त्वाचे आहे. अशा भागांत कोणताही मोठा प्रकल्प राबवताना पर्यावरणीय परिणामांचे सखोल आणि स्वतंत्र मूल्यमापन झाले पाहिजे.

जळगाव जिल्हा बँकेत अजितदादा पवार यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण!

शेतकऱ्यांना सहकार राज्यमंत्री बाबासाहेब पाटील यांचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

जळगाव। प्रतिनिधी : जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आवारात महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री (कै.) अजितदादा पवार यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण सहकार राज्यमंत्री बाबासाहेब पाटील आणि जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. राज्यात पावसाअभावी निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी खचून न जाता संकटाचा धैर्याने सामना करावा आणि आत्महत्येचा मार्ग स्वीकारू नये, असे आवाहन राज्यमंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, मदतीसाठी तिजोरी खाली करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. जिल्हा बँकेत आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री गुलाबराव पाटील होते. त्यांच्या उपस्थितीत अजितदादांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. बँकेचे उपाध्यक्ष आमदार अमोल पाटील यांनी प्रास्ताविक केले, तर बँकेचे अध्यक्ष संजय पवार यांनी मनोगत व्यक्त



केले. उपस्थित मान्यवरांचे अजित पवार यांच्या जीवनावरील पुस्तक आणि गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाला नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. १९७२ च्या दुष्काळाच्या आठवणींना उजाळा राज्यमंत्री बाबासाहेब पाटील यांनी राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीवर भाष्य करताना १९७२ च्या दुष्काळाच्या आठवणींना उजाळा दिला. त्या काळात अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झाली होती. शेतकऱ्यांनी अनेक अडचणींचा सामना केला; मात्र संकटासमोर हार न मानता परिस्थितीशी दोन हात केले, असे त्यांनी नमूद केले. आजही पावसाअभावी शेतकरी अडचणीत सापडले आहेत. अशा वेळी शेतकऱ्यांनी निराश न होता धैर्याने संकटाचा सामना करावा. शासन शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी कटिबद्ध असून, त्यांनी आत्महत्येचा विचार न करता परिस्थितीवर मात करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन बाबासाहेब पाटील यांनी केले.अजितदादांचे कार्य शेतकरीहितासाठी प्रेरणादायी अजित पवार यांच्या कार्याचा गौरव करताना बाबासाहेब पाटील म्हणाले की, सहकार क्षेत्र हे महाराष्ट्राला लाभलेले मोठे वरदान आहे. या क्षेत्रामुळे महाराष्ट्राने देशात वेगळी ओळख निर्माण केली आहे. अजितदादा पवार यांची प्रशासनावर मजबूत पकड होती. कार्यकर्त्यांशी आपुलकीने वागणारे आणि अर्थखात्याच्या कामकाजाला योग्य दिशा देणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख होती. त्यांनी ज्या खात्याची जबाबदारी स्वीकारली, त्या खात्याच्या कामकाजावर आपल्या कार्याचा ठसा उमटवला. राज्याचा विकास आणि जनतेचे हित हे त्यांच्या कामकाजाचे प्रमुख उद्दिष्ट होते. दूरदृष्टी असलेल्या या नेत्याचा पुतळा जिल्हा बँकेत येणाऱ्या शेतकरी, सभासद आणि कर्मचाऱ्यांना त्यांच्या कार्याची सातत्याने आठवण करून देईल. त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन शेतकरीहितासाठी काम करण्याची ऊर्जा मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. ‘दादांच्या आदर्शाने बँकेचे काम सुरू’ — संजय पवार जिल्हा बँकेचे अध्यक्ष संजय पवार यांनी अजितदादा पवार यांच्या शेतकरीहिताच्या भूमिकेचा उल्लेख केला. शेतकऱ्यांना भरीव मदत मिळावी आणि त्यांचे प्रश्न सोडवले जावेत, हा अजितदादांच्या कार्यातील महत्त्वाचा भाग होता. त्यांच्या आदर्शातून प्रेरणा घेऊन जिल्हा बँक शेतकरीहिताचे निर्णय घेत आहे, असे त्यांनी सांगितले. अजितदादांनी जातीपातीच्या राजकारणापेक्षा सर्वसामान्य नागरिक आणि शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य दिले. त्यांच्या कार्याची आठवण जिल्हा बँकेतील हा पुतळा सातत्याने करून देईल, असे संजय पवार म्हणाले.

नांदगावात राष्ट्रीय जंतनाशक दिन उत्साहात!

जन सम्राट टाईम्स

नांदगाव | प्रतिनिधी : राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमित्त २७ ऑक्टोबर रोजी नांदगाव शहरातील निकी न्यू इंग्लिश स्कूल, आदर्श प्राथमिक शाळा आणि आयटीआय महाविद्यालय येथे जंतनाशक मोहीम उत्साहात राबविण्यात आली. ‘जंतमुक्त बालक, निरोगी बालक’ हा संदेश देत आरोग्य विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळ्यांचे वाटप करण्यात आले. या मोहिमेमुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य आणि स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण करण्यावर भर देण्यात आला. तालुका आरोग्य अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन नांदगाव तालुक्याचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संतोष जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. आरोग्य सेवक वैभव गुडडे यांनी कार्यक्रमाच्या नियोजनासाठी आणि अंमलबजावणीसाठी विशेष परिश्रम घेतले. यावेळी आशा सेविका शिंदे मॅडम, माया शिंदे, शालिनी मोरे यांच्यासह आरोग्य विभागातील कर्मचारी उपस्थित होते. जंतसंसर्गाविषयी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना जंतसंसर्गामुळे होणारे आजार, त्यांची लक्षणे आणि प्रतिबंधात्मक



उपाय यांची माहिती देण्यात आली. वैयक्तिक स्वच्छता राखणे, जेवणापूर्वी आणि शौचालयाचा वापर केल्यानंतर हात स्वच्छ धुणे, स्वच्छ पाणी पिणे आणि संतुलित आहार घेणे यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. शाळांचे मुख्याध्यापक आणि शिक्षकांनीही या मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. आरोग्य विभाग आणि शैक्षणिक संस्थांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक सवयी रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला. निरोगी बालकांसाठी आरोग्य विभागाचा पुढाकार राष्ट्रीय जंतनाशक दिन हा बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचा उपक्रम आहे. योग्य मार्गदर्शनाखाली जंतनाशक औषधांचा वापर केल्याने जंतसंसर्गाचा धोका कमी करण्यास मदत होते.

कृषी विद्यापीठातील कथित १०० कोटींच्या गैरव्यवहाराविरोधात आझाद मैदानावर बेमुदत धरणे!

जन सम्राट टाईम्स

मुंबई। प्रतिनिधी : वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील कथित १०० कोटी रुपयांपेक्षा अधिकच्या आर्थिक गैरव्यवहाराची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी आजाद समाज पार्टी (कांशीराम), महाराष्ट्र राज्याच्या वतीने २६ ऑक्टोबर २०२६ रोजी मुंबईतील आझाद मैदानावर बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात आले. विद्यापीठातील आर्थिक अनियमिततांबाबत दोन चौकशी अहवालांत गंभीर निष्कर्ष नोंदविण्यात आल्याचा दावा आंदोलकांनी केला असून, संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या भूमिकेची सखोल तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. दोन चौकशी अहवालांत अनियमितता उघड झाल्याचा दावा विद्यापीठातील आर्थिक व्यवहारांबाबत तयार करण्यात आलेल्या दोन चौकशी अहवालांत अनियमितता आणि गैरव्यवहारासंबंधी गंभीर बाबी समोर आल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला आहे. या अहवालांची अधिकृत माहिती सार्वजनिक करून संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी, नियंत्रक अनंत कदम आणि अभियंता दीपक कशाळकर यांच्यासह संबंधित जबाबदार व्यक्तींच्या भूमिकेची सखोल चौकशी करावी, अशी मागणी प्रदेश उपाध्यक्ष तथा मराठवाडा प्रभारी अरविंद कांबळे यांनी केली आहे. सार्वजनिक निधीचा गैरवापर झाल्याचे चौकशीत सिद्ध झाल्यास संबंधितांकडून रक्कम वसूल करावी, तसेच कायद्यानुसार गुन्हे दाखल करून प्रशासकीय कारवाई करावी, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली. कृषी विद्यापीठाशी संबंधित निधी हा शेतकरी, विद्यार्थी आणि सार्वजनिक हिताशी निगडित असल्याने या प्रकरणाची शासनाने गांभीर्याने दखल घ्यावी, असेही आंदोलनकर्त्यांनी म्हटले आहे. प्रमुख पदाधिकाऱ्यांचा पाठिंबा या बेमुदत धरणे आंदोलनाला प्रदेश उपाध्यक्ष सुमित साबळे, मुंबई प्रदेशाध्यक्ष कैलास जयस्वार, भीम आर्मीचे प्रदेशाध्यक्ष अशोक कांबळे, प्रदेश सचिव आशिष नगराळे, प्रदेश सचिव तथा ठाणे जिल्हा प्रभारी संदेश सकपाळ, युवा प्रदेश महासचिव संदीप मोरे, ठाणे शहर कोषाध्यक्ष हुसेन शेख, महिला अध्यक्षा भाग्यश्री गायकवाड, युवा अध्यक्ष साहिल खरात, ओंकार कांबळे आणि आदर्श शिवशंकर यांनी आंदोलनस्थळी उपस्थित राहून पाठिंबा दिला. अरविंद कांबळे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन या आंदोलनाचे नेतृत्व आजाद समाज पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष तथा मराठवाडा प्रभारी अरविंद कांबळे करीत आहेत. त्यांच्यासोबत मराठवाडा कार्याध्यक्ष तातेराव ससाणे, जिल्हा प्रभारी राहुल साबळे, जिल्हाध्यक्ष विजय देवराव शिनगारे आणि युवा जिल्हा सचिव मनीष शेळके यांच्यासह पक्षाचे कार्यकर्ते सहभागी झाले आहेत.

अहिर सुवर्णकार मंडळातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहात संपन्न!

पाचोरा येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान; मान्यवरांच्या उपस्थितीत शिक्षण, मेहनत आणि जिद्दीचा संदेश

जन सम्राट टाईम्स

पाचोरा। प्रतिनिधी : अहिर सुवर्णकार मंडळ, पाचोरा, जिल्हा जळगाव यांच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा २०२६ रविवार, दि. २५ ऑक्टोबर २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांना भविष्यातील वाटचालीसाठी प्रोत्साहन देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. मान्यवरांच्या उपस्थितीने सोहळ्याला विशेष महत्त्व या कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर



म्हणून विनेशजी एकनाथशेठ कोठलीकर (धर्मादाय सह आयुक्त, पुणे विभाग, पुणे), सिद्धेश संजय थोरात (वैज्ञानिक अधिकारी, टाटा मूलभूत संशोधन संस्था — TIFR, मुंबई) आणि निताताई प्रविणशेठ जडे (महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट कारागीर पुरस्कारप्राप्त, हस्तकला क्षेत्र, पारोळा) यांची उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या उपस्थितीत गुणवंत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीचे कौतुक करण्यात आले. त्यांच्या यशामागील मेहनत, सातत्य, शिस्त आणि जिद्द यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहन शिक्षणाच्या बळावर जीवनात प्रगती साधता येते. त्यासाठी ध्येय निश्चित करून सातत्यपूर्ण प्रयत्न करणे आवश्यक आहे, हा संदेश या सोहळ्यातून देण्यात आला. विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रेरणा मिळावी, त्यांच्या गुणवत्तेला योग्य व्यासपीठ उपलब्ध व्हावे आणि समाजातील इतर विद्यार्थ्यांनीही शैक्षणिक प्रगतीसाठी प्रयत्न करावेत, या उद्देशाने मंडळाने हा उपक्रम राबविला. विद्यार्थ्यांचा सन्मान हा केवळ त्यांच्या आतापर्यंतच्या यशाचा गौरव नसून उज्ज्वल भविष्यासाठी मिळणारी प्रेरणाही आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास आणि समाजात शिक्षणाविषयी सकारात्मक वातावरण निर्माण होण्यास मदत होते. शैक्षणिक प्रगतीसाठी प्रेरणादायी उपक्रम अहिर सुवर्णकार मंडळाच्या या उपक्रमाचे समाजबांधवांकडून कौतुक होत आहे. गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रोत्साहन देणारा हा सोहळा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

मुलीच्या साखरपुड्यापूर्वीच काळाने हिरावले आई-वडील

जन सम्राट टाईम्स

जळगाव | प्रतिनिधी : भुसावळ तालुक्यातील सुसरी शिवारात शेतात काम करताना विजेचा धक्का लागून शेतकरी दाम्पत्याचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना सोमवारी दुपारी घडली. अशोक बाबूराव पाटील (वय ५५) आणि सरिता अशोक पाटील (वय ४३, रा. सुसरी, ता. भुसावळ) अशी मृतांची नावे आहेत. कांद्याच्या पिकातील तण काढत असताना शेतात पडलेल्या विद्युत तारेशी संपर्क आल्याने दोघांचा जीव गेल्याची प्राथमिक माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अशोक पाटील आणि त्यांच्या पत्नी सरिता पाटील हे नेहमीप्रमाणे सोमवारी मजुरांसोबत शेतात गेले होते. कांद्याच्या पिकात तण वाढल्याने ते निंदणीच्या कामात व्यस्त होते. याच वेळी अशोक पाटील यांचा शेतात खाली पडलेल्या विद्युत तारेशी संपर्क आला आणि त्यांना जोरदार विजेचा धक्का बसला. पतीला मदत करण्यासाठी किंवा जवळच काम करत असताना सरिता पाटील यांनाही विजेचा धक्का लागला.घटनेनंतर दोघांना तातडीने वरणगाव ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून दोघांनाही मृत घोषित केले. या दुर्घटनेने सुसरी परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये शोककळा पसरली आहे. विद्युत तार खाली पडण्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, त्याबाबत चौकशी सुरू आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

धुळेकरांची दिवाळी गोड! रावेर शिवारातील 725 एकर जमीन एमआयडीसीकडे हस्तांतरित करण्यास मंजुरी!

पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या नेतृत्वात आमदार अनुपभैया अग्रवाल यांच्या दोन वर्षांच्या पाठपुराव्याला यश

जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी: धुळे शहराच्या औद्योगिक विकासाला नवी दिशा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. धुळे शहरालगतच्या रावेर शिवारातील २८९ हेक्टर ६९ आर, म्हणजेच सुमारे ७२५ एकर जमीन धुळे येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे (एमआयडीसी) हस्तांतरित करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे धुळे शहरात औद्योगिक विस्ताराचा मार्ग मोकळा होण्याची अपेक्षा असून, स्थानिक युवक-युवतींसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होण्यास मदत होणार आहे. धुळे शहराचे आमदार अनुपभैया अग्रवाल यांनी रावेर शिवारात एमआयडीसी सुरू करण्यासाठी गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या या प्रयत्नांना अखेर यश आले असून, पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या नेतृत्वात धुळेकरांना दिलेल्या आश्वासनाच्या पूर्ततेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. दोन वर्षांच्या पाठपुराव्याला यश धुळे शहराच्या औद्योगिक विकासासाठी रावेर शिवारातील जमीन उपलब्ध करून देण्याचे आश्वासन आमदार अनुपभैया अग्रवाल यांनी विधानसभा निवडणुकीदरम्यान दिले होते. त्यानंतर या जमिनीच्या हस्तांतरणासाठी त्यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या विषयावर चर्चा होऊन २८९ हेक्टर



६९ आर जमीन एमआयडीसीकडे हस्तांतरित करण्यास मंजुरी देण्यात आली. त्यानुसार महसूल विभागाकडून जमीन हस्तांतरित करण्याची प्रक्रिया पुढे नेण्यात आली आहे. या निर्णयामुळे धुळे शहराच्या औद्योगिक विकासासाठी मोठ्या प्रमाणावर जमीन उपलब्ध होणार आहे. पालकमंत्री जयकुमार रावल म्हणाले, आमदार अग्रवाल यांच्या पाठपुराव्याला यश राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मुंबई येथे पालकमंत्री जयकुमार रावल आणि आमदार अनुपभैया अग्रवाल यांनी पत्रकारांना या निर्णयाची माहिती दिली. पालकमंत्री रावल म्हणाले की, धुळे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने औद्योगिकीकरणाला चालना देणे आवश्यक आहे. आमदार अनुपभैया अग्रवाल यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे रावेर शिवारातील जमीन एमआयडीसीकडे हस्तांतरित करण्याचा विषय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडण्यात आला. त्यावर चर्चा होऊन जमीन हस्तांतरणास मंजुरी देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य शासनाने धुळे जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाच्या दृष्टीने हा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले धुळे एमआयडीसीचा भारत विकास उद्योग योजनेत समावेश पालकमंत्री जयकुमार रावल यांनी दिलेल्या माहितीनुसार, केंद्र सरकारने औद्योगिकीकरणाला चालना देण्यासाठी भारत विकास उद्योग योजना जाहीर केली आहे. या योजनेत समावेशासाठी ३१ ऑक्टोबर ही अंतिम मुदत असल्याने, त्यापूर्वी रावेर शिवारातील ७२५ एकर क्षेत्रावरील प्रस्तावित औद्योगिक वसाहतीचा या योजनेत समावेश करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याचे रावल यांनी सांगितले. या योजनेत समावेश झाल्यास धुळे शहराच्या औद्योगिक विस्ताराला आणि गुंतवणुकीच्या संधींना चालना मिळण्याची अपेक्षा आहे. औद्योगिक विकासाच्या नव्या पर्वाची अपेक्षा रावेर शिवारातील जमीन एमआयडीसीकडे हस्तांतरित करण्याच्या निर्णयामुळे धुळे शहराच्या औद्योगिक विस्तारासाठी महत्त्वाची पायाभरणी झाली आहे. प्रस्तावित औद्योगिक वसाहतीत उद्योग उभारणी, गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीला कितपत गती मिळते, याकडे आता धुळेकरांचे लक्ष लागले आहे. स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात आणि जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला बळकटी मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

